MHRG020002892024

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२४ मधील निशाणी क्र.०१ वर आदेश

CNR : **MHRG020002892024**

प्रस्तुतचा अर्ज, श्रीमती वृषाली सुरेश पाटील व श्री. ओमकार सुरेश पाटील यांनी भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, मयत सुरेश बाळकृष्ण पाटील हे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ याचे वडील आहे. मयत सुरेश बाळकृष्ण पाटील हे एम.जी.एम. हॉस्पीटल कामोठे येथे मरण पावले आहे. मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांच्या मृत्युपश्च्यात त्यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांचे नावे पुढील वर्णनाचे चारचाकी वाहन आहे. MH06–BW–4457 क्रमांकाची पॅसेंजर कार व पेण आर.टी.ओ. यांचेकडील परमिट क्रमांक MH06/2620/TAXI/ALBAG/1999. सदरचे वाहन अर्जदार क्र.१ हिच्या नावावर नोंद करण्याकरीता गेले असता सदर कार्यालयातील अधिकाऱ्यांने गाडीचे कागदोपत्री अर्जदाचे वारस नाव नोंदण्याकरीता न्यायालयाचे दाखल्याचे आवश्यकता आहे अशी सूचना दिली आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिच्या नावे वारस प्रमाण पत्र (Heirship Certificate) मिळणे आवश्यक आहे. सबब सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जदार हे मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांचे वारस असल्याबाबतचा दाखला देण्यास कोणाची हरकत असल्यास ती हरकत या न्यायालयामध्ये एक महिन्यात नोंदविण्याकरीता दि.२८/०२/२०२४ रोजी दैनिक 'कृषीवल' या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. त्या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र.१४ वर दाखल केलेली आहे. या शिवाय मौजे सागरगड, पो. खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नोटीस फलकावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. अलिबाग येथील दिवाणी न्यायालयाच्या

नोटीस बोर्डावर देखील जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. मयत इसम राहत असलेल्या घराच्या समोरील बाजूस जाहीरनामा डकवून प्रसिध्द करण्यात आला. तसेच मयत इसम राहत असलेल्या भागामध्ये जाहीर दवंडी देण्यात आली त्याबाबतची दवंडी पावती निशाणी क्र.८ वर आहे. अशा प्रकारे नोटीस प्रसिध्द करून देखील आज अखेर कोणीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहिला आहे.

४. अर्जदाराने क्र.१ यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्टयर्थ निशाणी क्र.११ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदारांनी मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र.१५ वर दाखल केले आहे. त्यावरून ते दि.२३/०९/२०२३ रोजी मरण पावल्याचे स्पष्ट होते. मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांच्या नावावर असलेली वाहनाची आर.सी.बुकची मुळ प्रत निशाणी क्र.१७ वर दाखल केली आहे. मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांच्या नावावर असलेल्या वाहनासंबंधीची प्रादेशिक परिवहन प्राधिकरण रायगड–पेण यांनी दिलेल्या परवानाची मुळ प्रत नि.क्र.१८ वर दाखल केली आहे. अर्जदार क्र.२ यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्टयर्थ निशाणी क्र.१९ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच साक्षीदार चंद्रशेखर शदर चोगले यांनी नि.क्र.२० वर शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार तर्फे युक्तीवाद ऐकण्यात आले.

५. प्रस्तुत प्रकरणात मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांचे वारस म्हणून इतर कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदार हे मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांची पत्नी व मुले असून ते वर्ग १ वारस ठरतात. परंतु अर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिच्या लाभात वारस दाखला देण्याची विनंती केली आहे. त्यास अर्जदार क्र.२ यांनी देखील अर्जातच संमती दिले आहे तसेच नि.क्र.१९ वर शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ यांना वारस प्रमाणपत्र मिळणे योग्य व न्यायाचे आहे. सदरचे प्रमाणपत्र हे कार्यालयीन कामकाजासाठी देण्यात येत आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ श्रीमती वृषाली सुरेश पाटील या मयत सुरेश बाळकृष्ण पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरचे प्रमाणपत्र हे कार्यालयीन कामकाजासाठी देण्यात येते.

४. आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर अर्जदारांना प्रमाणपत्र देण्यात यावे.

VARSHA BALVANTRAO PATIL

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2024.04.10 17:47:57 +0530

ठिकाणः अलिबाग (सौ. व. ब. पाटील)

दिः१०/०४/२०२४ तिसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अलिबाग.